International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.12 No.3 January – February 2025

# इतिहास अध्यापनात मूल्यधारिकतेचा सकारात्मक परिणाम

**प्रा. भालचंद्र भाऊ मुंबरकर**
सहाय्यक प्राध्यापक, श्री शांताराम कृष्णाजी पंतवालावलकर अध्यापक महाविद्यालय, देवगड, सिंधुदुर्ग
*Corresponding Author - प्रा. भालचंद्र भाऊ मुंबरकर*
**DOI - 10.5281/zenodo.17138802**

*इतिहास सध्या पणात मूल्यधारकतेचा सकारात्मक परिणाम पाहत असताना इतिहासाची कालखंडानुसार, विषयानुसार व विविध स्तरानुसार रचनेचा अभ्यास केला. यामध्ये प्रामुख्याने इतिहास अध्यापनातील मूल्यधारकतेची कारण मी मावसा नैतिक, सामाजिक, राष्ट्रीय, सांस्कृतिक, मानवतावादी, पर्यावरण व जागतिक मूल्यांच्या आधारे मांडण्यात आलेली आहे. इतिहास अध्यापनात मूल्यधारीत करण्याचे मार्ग पाहत असताना यामध्ये महान व्यक्तिमत्त्वांचे चरित्र कथन, ऐतिहासिक घटनांचा मूल्यभिमुख अभ्यास, भूमिका अभिनय नाट्यरूपांतर, प्रकल्प कार्य, चर्चासित्रेला वादविवाद, नकाशा चित्र मल्टीमीडिया चा वापर व प्रामुख्याने शिक्षकांचा आदर्श यांच्या माध्यमातून होऊ शकतो व यातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होऊ शकतो.*

**प्रस्तावना:**

इतिहास म्हणजे भूतकाळात घडलेल्या घडामोडींचा शोध हो असे म्हटले जाते पण तसे पाहता इतिहास म्हणजे भूतकाळाची नोंद नव्हे, तर तो मानवाच्या विचारांचा, कृतींचा आणि समाजाच्या विकासाचा आरसा आहे. इतिहासाच्या अध्यापनातून केवळ घटना आणि तारखा शिकवल्या जात नाहीत, तर त्या मागची मूल्ये शिकवणूक आणि समाजाला दिलेले दिशा यांचाही अभ्यास होतो म्हणूनच इतिहास अध्यापन हे मूल्यधारित असते आणि असणे आवश्यकही आहे.

इतिहास शिकताना विद्यार्थ्यांना विविध प्रकारचे मूल्ये आत्मसात करता येतात त्यासाठी इतिहास शिक्षकाने इतिहास अध्यापनातील अध्यापनातील मूल्यांचे स्वरूप लक्षात घेणे आवश्यक आहे. विविध स्वातंत्र्य लढ्यातील कथा, क्रांतिकारकांचा त्याग, आणि राष्ट्रासाठी दिलेले बलिदान यांचा विद्यार्थ्यांच्या मनावर प्रभाव टाकण्यासाठी राष्ट्रभक्ती व कर्तव्यनिष्ठा या मूल्यांचा विचार केला जातो. सामाजिक समता व न्याय प्रस्थापित करण्यासाठी भूतकाळातील समाज सुधारक – फुले,शाहू,आंबेडकर यांच्या कार्यातून सामाजिक न्याय, समता आणि आत्मसन्मानाचे मूल्य समजून सांगण्यास मदत होते. भारताने सर्वधर्म सहिष्णुतेचे धोरण स्वीकारलेले आहे त्यानुसार भारताच्या विविधतेत एकतेचा इतिहास विद्यार्थ्यांमध्ये सहिष्णुता व सर्व समावेशकतेचे मूल्य रुजवते.

आजच्या काळाचा विचार करता भारतामध्ये हिंसात्मक जातीय दंगली खूप मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. या पासून भारतीय समाजाचे संरक्षण करण्यासाठी अहिंसा व शांतता या मूल्याच्या प्रसार करू शकतो. त्यासाठी त्यासाठी महात्मा, भगवान

बुद्ध, वर्धमान महावीर,सम्राट अशोक यांचे अहिंसेचे तत्त्वज्ञान आजच्या हिंसक वातावरणात अत्यंत उपयुक्त ठरते. त्याचप्रमाणे समाजामध्ये ढासळत चाललेले नैतिकता व सत्यनिष्ठता हे पटवून देण्यासाठी इतिहासातील काही प्रसंग जसे हर्षवर्धनाची धर्मनिष्ठा, छत्रपती शिवाजी महाराजांचा सर्व समाजातील लोकांकडे पाहण्याचा दृष्टिकोन, स्त्रियांबद्दल आदर अशी विविध जिवंत उदाहरणे आपणास देता येतील.

**अभ्यासाची उद्दिष्टे :**

या संशोधनासाठी खालील उद्दिष्टे निश्चित केलेली आहेत.

१. इतिहास विषयाच्या रचनेचा शोध घेणे.

२. इतिहास विषय अध्यापनातील विविध मूल्यांचा शोध घेणे.

३. इतिहास अध्यापनात मूल्यधारीकतेच्या कारणांचा शोध घेणे.

४. इतिहास अध्यापन मूल्यधारीत करण्याचे मार्ग सुचविणे.

**संशोधन पद्धती**

संशोधनाच्या पूर्ततेसाठी विविध पुस्तके, मासिके, नियतकालिके, लेख आणि इंटरनेट वेबसाईट वरील विविध माहितीच्या आधारे केले जाणार आहे

**इतिहास विषयाची रचना:**

इतिहास हा केवळ भूतकाळाच्या घटना सांगणारा विषय नसून तो समाजाच्या परिवर्तनाचा अभ्यास करणारा शास्त्रशुद्ध विषय आहे. या विषयाची रचना अशी असते की तो भूतकाळातील घटनांची क्रमबद्धता, परिणामकारकता, कारणी मिमांसा आणि सांस्कृतिक व सामाजिक मूल्ये स्पष्ट करते. त्यामुळे इतिहास विषयाची रचना नीट समजून घेणे आवश्यक आहे.

**इतिहास विषयाची मुख्य रचना:**

कालखंडानुसार त्रिकाल विभाजन:

**१.प्राचीन इतिहास:**

भारतीय इतिहासातील तीन प्रमुख कालखंडापैकी प्राचीन कालखंड यामध्ये इसवी सन पूर्व 2500 मधील सिंधू संस्कृती पासून ते इसवी सन 700 ते 800 पर्यंतचा कालखंड प्राचीन इतिहास म्हणून ओळखला जातो हा कालखंड भारतीय संस्कृती धर्म तत्त्वज्ञान कला विज्ञान व राजकारणाचा पाया रचणारा आहे. भारतीय प्राचीन इतिहास हा मानव जातीस दिलेला अमूल्य ठेवा आहे. या काळात घडलेले सामाजिक धार्मिक व सांस्कृतिक बदल आजही भारतीय जीवन शैलीवर ठसा उमटवतात. प्राचीन इतिहासाचा अभ्यास हा विद्यार्थ्यांसाठी केवळ शैक्षणिक नव्हे तर मूल्य संवर्धनात्मक ठरतो.

**२.मध्ययुगीन इतिहास:**

मध्ययुगीन इतिहास हा इसवी सन 700 ते 750 पासून ते इसवी सन 1757 प्लासीची लढाई पर्यंतचा मानला जातो.या काळात अनेक परकीय आक्रमणे, राजवंशाची उभारणी, सांस्कृतिक देवाणघेवाण आणि सामाजिक सांस्कृतिक परिवर्तन झाले. मध्ययुगीन भारतीय इतिहासात राजकीय चढ - उतार धार्मिक चळवळी आणि सांस्कृतिक एकात्मतेचा कालखंड होता.या काळात भारतीय समाजाला सहिष्णुता, सहजीवन,भक्ती, सुफी विचार यांचा ठसा लाभला.मराठ्यांच्या उदया नंतर

भारताच्या इतिहासात नवीन आधुनिक युगाचा प्रारंभ झाला.

**३.आधुनिक इतिहास:**

आधुनिक इतिहास हा इसवी सन 1857 पासून इसवी सन 1947 पर्यंतचा मानला जातो. हा काळ भारतीय समाज जीवनात सर्वात मोठ्या बदलांचा साक्षीदार ठरतो.आधुनिक भारतीय इतिहासात गुलामगिरीतून स्वातंत्र्याकडे झालेल्या प्रवासाचा कालखंड आहे . या काळात भारतीय समाजात सामाजिक जागृती, राष्ट्रीय चेतना आणि लोकशाही विचारांची पायाभरणी झाली. स्वातंत्र लढ्यातील त्याग त्यागी नेते आणि चळवळीमुळे भारताला 1947 मध्ये स्वातंत्र प्राप्त झाले.

**विषयानुसार विभागणी:**

**१. राजकीय इतिहास:**

राजकीय इतिहास म्हणजे राष्ट्र किंवा समाजातील सत्ता नेतृत्व,युद्धे, तह साम्राज्याची उभारणी व पतन यांचा अभ्यास होय. यात प्रामुख्याने राजे-महाराजे, युद्ध,साम्राज्य, राज्यकारभार व प्रशासन यांचा अभ्यास केला जातो पूर्वी इतिहास म्हटलं की फक्त राजकीय घटनाच समजल्या जात होत्या. राजकीय इतिहास हा इतिहासाच्या अभ्यासाचा पाया आहे.

**२.सामाजिक इतिहास:**

सामाजिक इतिहास म्हणजे एखाद्या काळातील समाजव्यवस्था, जाती- धर्म, स्त्री-पुरुषांचे स्थान,शिक्षण, परंपरा, रूढी -प्रथा, उत्सव- समारंभ, दैनंदिन जीवन पद्धती यांचा ऐतिहासिक अभ्यास होय. सामाजिक इतिहासामुळे सामान्य लोकांचे जीवन दैनिक घडामोडी समाजासमोर मांडता येतात. सामाजिक इतिहासामुळे आपल्याला सामान्य माणसाचा इतिहास समजतो त्यामुळे इतिहास अभ्यासताना राजकीय घडामोडींसोबतच सामाजिक परिस्थितीची जाणीव होते.

**३. आर्थिक इतिहास:**

एखाद्या समाजाचा पाया हा त्याच्या अर्थव्यवस्थेवर उभा असतो. शेती, उद्योग, व्यापार, कर प्रणाली आणि संपत्तीचे वितरण यांचा इतिहास म्हणजे आर्थिक इतिहास. हा इतिहास आपल्याला समाजातील आर्थिक स्थिती व बदल याची माहिती देतो. आर्थिक इतिहास आपल्याला दाखवतो की एखादी समाजाची प्रगती किंवा अधोग होती मोठ्या प्रमाणावर त्याच्या अर्थव्यवस्थेवर अवलंबून असते. राजकीय सत्ता असोवा सामाजिक बदल त्यामागे अनेकदा आर्थिक कारणे असतात.

**4. सांस्कृतिक इतिहास:**

मानवाने केवळ सत्ता, समाज रचना आणि अर्थव्यवस्था याचाच नव्हे तर कला, साहित्य, धर्म, परंपरा, तत्त्वज्ञान आणि शिक्षण याचाही विचार केला आहे. हाच भाग म्हणजे सांस्कृतिक इतिहास. सांस्कृतिक इतिहास आपल्याला दाखवतो की समाजाच्या खरा आत्महत्याच्या कला, साहित्य,धर्म व शिक्षणात असतो,सांस्कृतिक वारसा जपला तरच राष्ट्राची ओळख टिकून राहते.

**5. विज्ञान व तंत्रज्ञानाचा इतिहास:**

मानव जातीच्या प्रगतीमध्ये विज्ञान व तंत्रज्ञानाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. प्राचीन काळापासून आधुनिक काळापर्यंत भारताने गणित, खगोलशास्त्र, आयुर्वेद, धातुकर्म, स्थापत्य, वाहतूक

यामध्ये मौलिक कामगिरी केली आहे. विज्ञान व तंत्रज्ञानाचा इतिहास आपणास असं दाखवतो की मानवाची प्रगती ही केवळ युद्धात नसून विविध नवनवीन शोध, प्रयोग व नाविन्यपूर्ण बदल यामध्ये आहे. भारतीय प्राचीन वारसा व आधुनिक संशोधन या दोन्हीमुळे भारताच्या विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रात गौरवशाली प्रगती झालेली आहे.

**3. शालेय स्तरानुसार रचना:**

**1. प्राथमिक स्तर:**

इयत्ता पहिली ते पाचवी या टप्प्यात मुलांचा कुतूहल , कल्पनाशक्ती व गोष्टी ऐकण्याची आवड यांचा विकास होतो. त्यामुळे या स्तरावर इतिहास शिकवताना गोष्टीच्या माध्यमातून भूतकाळाची जोडणे हा मुख्य उद्देश ठेवला जातो. प्राथमिक स्तरावर इतिहास हा ज्ञान देण्यापेक्षा संस्कार घडवण्यासाठी शिकवला जातो. भूतकाळातील कथा व्यक्ती आणि वारसा यांच्या माध्यमातून मुलांमध्ये देशभक्ती, प्रामाणिकपणा आणि आदर्श जीवनमूल्ये रुजवणे हाच मुख्य उद्देश असतो

**2. माध्यमिक स्तर:**

या वयात विद्यार्थ्यांची तर्कशक्ती ,समाज आणि विश्लेषण क्षमता वाढत असते.त्यामुळे इतिहास शिकवताना फक्त गोष्टी न सांगता घटनांचा क्रम ,कारणे आणि परिणाम समजावून सांगणे आवश्यक असते.माध्यमिक स्तरावर इतिहास शिकवण्याचा मुख्य उद्देश म्हणजे विध्यार्थ्यांना घटनांचे कारण – परिणाम समजावून देणे आणि त्याना सजग नागरिक बनवणे.

**3. उच्च माध्यमिक स्तर:**

उच्च माध्यमिक स्तरावर इतिहास शिकवण्याचा मुख्य उद्देश म्हणजे विध्यार्थ्यांना फक्त भूतकाळाचे समजावणे नव्हे, तर भूतकाळाचे चिकिस्तक विश्लेषण करून भविष,वर्तमान व भविष्यासाठी योग्य दृष्टीकोन विकसित करणे.या वयात विध्यार्थांची बौद्धिक व विश्लेषण शमता उच्चा पातळीवर विकसित होते .त्यामुळे इतिहास फक्त घटनांचा क्रम सांगणार न राहता घटनांचे सखोल विश्लेषण ,कारणीमीमांसा आणि ऐतिहासिक दृष्टीकोन विकसित करणे हे मुख्य उद्दिष्ट असते.

**4. विद्यापीठीय स्थर:**

विद्यापीठ स्तरावरील इतिहास हा केवळ ज्ञान केंद्रे न राहता संशोधन केंद्र व चिकित्सक बनतो. यातून विद्यार्थी फक्त चांगले इतिहासाचे जाणकारच होत नाहीत तर स्वतंत्र विचारवंत व संशोधक म्हणून समाजासमोर येतात. विद्यापीठ स्तरावर इतिहासाचा अभ्यास हा व्यवसायिक, संशोधन केंद्र व चिकित्सक दृष्टिकोनातून केला जातो. येथे इतिहास फक्त घटनांचा क्रम शिकवण्यापुरता मर्यादित राहत नाही. तर त्या मागील सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, राजकीय प्रक्रिया व तत्वज्ञान यांचा सखोल अभ्यास केला जातो.

**इतिहास अध्यापनातील मूल्यधारकतेची कारणमीमांसा:**

**1. नैतिक मूल्यांचा विकास:**

इतिहासातील महापुरुषांचे जीवन त्याग कर्तुत्व विद्यार्थ्यांना प्रामाणिकपणा सत्वनिष्ठ न्यायनिष्ट अशी नैतिक मूल्ये शिकवतात उदाहरण - महात्मा

गांधींचे सत्याग्रह आंदोलन - सत्य व अहिंसा यांचे मूल्य

**2.सामाजिक मूल्यांचा विकास:**

इतिहास विद्यार्थ्यांना समाज जीवनातील एकता सहकार्य लोकशाही बंधुभाव शिकवतो. उदाहरण - स्वातंत्र्य लढ्यातील सामूहिक चळवळी सामाजिक ऐक्य व सहकार्य .

**3. राष्ट्रीय मूल्यांचा विकास:**

इतिहासातून विद्यार्थ्यांना देशाभिमान राष्ट्रीय एकात्मता व देश सेवेची भावना निर्माण होते उदाहरण भगतसिंग राणी लक्ष्मीबाई यांचे योगदान देशभक्तीचे मूल्य

**4. सांस्कृतिक मूल्यांचा विकास:**

प्राचीन मध्ययुगीन व आधुनिक काळातील सांस्कृतिक वारसा विद्यार्थ्यांना समजतो त्यामुळे सहिष्णुता बहुसंस्कृतिकता परंपरांचा सन्मान ही मूल्ये दृढ होतात.

**5. मानवतावादी मूल्यांचा विकास:**

इतिहासामधील घडून गेलेले युद्ध संघर्ष व क्रांतीचा अभ्यास विद्यार्थ्यांना मानवी दुःख शांततेचे महत्व याची जाणीव करून देतो उदाहरण दोन महायुद्धांचा इतिहास मानवतावादी विचार व शांतता स्थापनेची गरज

**6. पर्यावरणीय व जागतिक मूल्यांचा विकास:**

प्राचीन संस्कृती कृषी पद्धती पर्यावरणाशी संबंधित घटना विद्यार्थ्यांना निसर्ग संपत्तीचे महत्त्व पटवून देतात तसेच जागतिकीकरण आंतरराष्ट्रीय संबंध यांचा अभ्यास करून जागतिक नागरिकत्व व सहजीवन ही मूल्ये बळकट होतात.

**इतिहास अध्यापन मूल्यधारित करण्याचे मार्ग:**

**1. महान व्यक्तिमत्त्वांचे चरित्र कथन:**

इतिहासामध्ये विविध म्हणीय व्यक्ती होऊन गेलेले आहेत त्यामध्ये गौतम बुद्ध, सम्राट अशोक, महात्मा गांधी, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज, भगतसिंग, महात्मा ज्योतिबा फुले यासारख्या महापुरुषांचे जीवन चरित्र सांगून सत्य अहिंसा न्यानेश्वर त्यात अशी मूल्ये विद्यार्थ्यात रुजवता येतात.

**2. ऐतिहासिक घटनांचा मूल्यभिमुख अभ्यास:**

इतिहासाचे अध्यापन अध्ययन करत असताना आपणास कालक्रमानुसार जावे लागते स्वातंत्र्यलढा सामाजिक सुधारणा चळवळी धार्मिक सहिष्णुतेची उदाहरणे यांचा अभ्यास करून लोकशाही समता बंधुभाव सहिष्णुता यासारखी मूल्ये विद्यार्थ्यांना शिकवता येतात.

**3. भूमिका अभिनय /नाट्य रूपांतर:**

ऐतिहासिक घटना व व्यक्तींचे भूमिका नाट्य सादर करून विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती शिस्त सहकार्य जबाबदारी या मूल्यांची जोपासना करता येते.

**4. प्रकल्प कार्य:**

आपल्या गावाचा इतिहास स्थानिक स्वातंत्र सैनिकांचा शोध किल्ल्यांचा अभ्यास असे प्रकल्प विद्यार्थ्यांना दिल्यास संशोधन वृत्ती सहकार्य कष्ट प्रेम राष्ट्रीय अभिमान हे मूल्ये विकसित होतात.

**5. शैक्षणिक सहली व अभ्यास भ्रमंती:**

ऐतिहासिक स्थळे संग्रहालय किल्ले शिलालेख यांची भेट घेऊन विद्यार्थ्यांना संस्कृतीचा सन्मान वर्षाचे संवर्धन पर्यावरण जाणीव ही मूल्ये शिकवता येतात.

**6. चर्चासत्रे व वादविवाद:**

अहिंसा विरुद्ध हिंसा राजा शिवाजींचे प्रशासन यासारख्या चर्चा मधून विद्यार्थ्यांमध्ये तार्किकता लोकशाही वृत्ती सहिष्णुता ही मूल्ये वाढतात.

**7. नकाशा चित्र मल्टीमीडिया यांचा वापर:**

चित्रपट डॉक्युमेंटरी नकाशे वापरून विद्यार्थ्यांना घटनांचा अनुभव देणे दृष्टिकोन विस्तार सहानुभूती मानवता ही मूल्ये विकसित होतात.

**8. शिक्षकांचा आदर्श:**

शिक्षक स्वतः सत्वनिष्ठ प्रामाणिक व सहकार्यशील राहिल्यास तो सर्वात प्रभावी मूल्य संस्कार ठरतो.

**निष्कर्ष:**

1. विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्यांचा विकास होईल
2. विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक मूल्यांची रुजवणूक होईल.
3. विद्यार्थी राष्ट्रीय मूल्ये आपल्या अंगीकृत करतील.
4. विद्यार्थ्यांमध्ये सांस्कृतिक मूल्यांचा विकास होईल
5. विद्यार्थ्यांमध्ये मानवतावादी पर्यावरणीय व जागतिक मूल्यांचा विकास होईल.

**संदर्भ:**

1. बापट.बी.डी.{२०१२}. शैक्षणिक मानसशास्त्र व अध्यापन कौशल्ये. पुणे: नूतन प्रकाशन.
2. देशपांडे.पी.डी.{२०१४},अध्यापनशास्त्र व प्रशिक्षण पध्दती.मुंबई : फडके प्रकाशन .
3. कुलकर्णी.एस. एस.{२०१६}शिक्षणपद्धती व इतिहास अध्यापन .कोल्हापूर ;श्रीविद्या प्रकाशन
4. जोशी.एम.व्ही.{२०१०}.शिक्षणतत्वज्ञान व शिक्षणशात्र :पुणे सुबोध प्रकाशन .
5. Phatak.R.P.{2014}.Teaching of History in Indian School .New Dilhi Pearson Education